॥ श्री गुरुदेव दत्त ॥ श्री स्वामी समर्थ ॥





## जागृत परंतु अपरिचित दत्त क्षेत्रांचे दर्शन घडविणारी

# श्रीदत्त परिक्रमा





## २७ दत्तक्षेत्रे आणि ४ शक्तिपीठांसह

**एसी स्लीपर कोच बसने प्रवास**

**पुणे ते पुणे (१२ दिवस)**

**● प्रत्येक दत्त-स्वामी भक्ताने अनुभवावी अशी एक उत्कट अनुभूती... ●**

शंकरमहाराज मठ - औदुंबर - अमरापूर - नृसिंहवाडी - पैजारवाडी - कुडूत्री - माणगाव - मुरगोड - बाळेकुंद्री - कुरवपूर - मंथनगोड - पीठापूर - माणिकनगर - बसवकल्याण - कडगंची - लाडचिंचोळी - गाणगापूर - अक्कलकोट - लातूर - माहूर - कारंजा - शेगांव - अनसुया - नारेश्वर - तिलकवाडा - गरुडेश्वर

**सहभागी शुल्क**
**रु. ४२,०००/- फक्त**

**ऑनलाईन नोंदणी करा**

**www.kardaliwan.com/dattaparikrama**

उत्तम हॉटेल व भक्तनिवास येथे व्यवस्था... मर्यादित जागा ...

माहितीपत्रक, नोंदणी अर्ज व वेळापत्रक 7057617018 या क्रमांकावर दत्त परिक्रमा असा संदेश पाठवून आपल्या व्हॉटसअपवर माहिती मागवा.

॥कर्दळीवन॥ सेवा संघ

**कर्दळीवन सेवा संघ, पुणे**

622, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिजजवळ, डेक्कन जिमखाना, पुणे - 04

मो: 9657709678 / 9371102439 व्हॉटस्ॲप : 7057617018

फोन: 020-25534601 / 25530371 ईमेल : swami@kardaliwan.com

# ✵ श्रीदत्त परिक्रमेचा नियोजित कार्यक्रम ✵

प्रत्येक सहभागी कुटुंबाला १) श्रीदत्त परिक्रमा, २) स्वर्गारोहिणी : जिथून पांडव स्वर्गाकडे गेले व ३) कर्दळीवन संजीवनी हा तीन पुस्तकांचा संच भेट दिला जाईल.

पहिला दिवस : १) शंकर महाराज मठ, पुणे, येथून (सकाळी ७ वाजता - प्रयाण) २) औदुंबर, ३) अमरापूर, ४) नृसिंहवाडी, ५) पैजारवाडी, ६) कोल्हापूर (मुक्काम)

दुसरा दिवस : ७) कुडूत्री, ८) माणगांव, ९) बाळेकुंद्री (मुक्काम)

तिसरा दिवस : १०) मुरगोड, ११) कुरवपूर (मुक्काम)

चौथा दिवस : १२) मंथनगोड, १३) गुंटूर (मुक्काम)

पाचवा दिवस : १४) पीठापूर दर्शन - पादगया आणि अन्नावरमसह + पीठापूर (मुक्काम)

सहावा दिवस : दिवसभर प्रवास आणि १५) माणिकनगर दर्शन (मुक्काम)

सातवा दिवस : १६) बसवकल्याण, १७) लाडचिंचोळी, १८) कडगंची १९) गाणगापूर (मुक्काम)

आठवा दिवस : २०) अक्कलकोट - तुळजापूर, २१) लातूर (मुक्काम)

नववा दिवस : २२) माहूर (मुक्काम)

दहावा दिवस : २३) कारंजा, २४) शेगाव + रात्र प्रवास

अकरावा दिवस : २५) तिलकवाडा, २६) गरुडेश्वर, २७) अनसुया (मुक्काम)

बारावा दिवस : पुण्याकडे प्रयाण - रात्री ९ वाजेपर्यंत पुण्यात आगमन

## ● नोंदणी प्रक्रिया व नियम :

**(१)** परिक्रमेमध्ये सहभागी होण्यापूर्वी श्रीदत्त परिक्रमा हे पुस्तक वाचावे त्यामुळे आपल्याला परिक्रमेचा अधिक आनंद घेता येईल.

**(२)** नोंदणी अर्ज आणि (संमती + हमीपत्र) + आधारकार्ड + १ फोटो आयडेंटि साईज.कार्यालयात जमा करावा लागेल किंवा ईमेल द्वारा, किंवा कुरियरने पाठवता येईल. नोंदणी करताना रु. २५,०००/- एवढी रक्कम भरावी लागेल. परिक्रमेमध्ये सहभागी होण्यासाठी केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही आणि नोंदणी रक्कम परत मिळणार नाही. परिक्रमा तारखेच्या १५ दिवस अगोदर कळविल्यास तारखांची / व्यक्तिंची अदलाबदल करता येईल. परिक्रमेच्या तारखेआधी १५ दिवस उर्वरित रक्कम भरावी लागेल. परिक्रमेदरम्यान आधी विहित केलेली एखादी कृती काही अपरिहार्य कारणामुळे रद्द झाल्यास कोणताही परतावा मिळणार नाही.

**(३)** नोंदणी ऑनलाईन करता येईल. नोंदणी रक्कम भरल्यावरच नोंदणी नक्की होईल. परिक्रमांच्या वेळापत्रकाप्रमाणे नोंदणी करून आपली जागा पक्की करावी. परिक्रमेसाठीची रक्कम आमच्या कार्यालयात रोखीने, चेकने किंवा आमच्या बँक ऑफ महाराष्ट्राच्या खात्यावर रोखीने, चेकने, ऑनलाईन ट्रान्सफर करून भरता येईल. शक्यतो रक्कम रोखीने द्यावी.

**(४)** नोंदणी करतानाच सीट क्रमांक दिले जातील.

**(५)** परिक्रमेमध्ये कर्दळीवन सेवा संघाने तयार केलेले नियम आणि शिस्त कसोशीने पाळावे लागतील, त्याबाबत नंतर तक्रार चालणार नाही. त्याची माहिती नोंदणी अगोदरच करून घ्यावी ही विनंती ऐनवेळी परिस्थितीनुरूप परिक्रमेच्या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार कर्दळीवन सेवा संघाने राखून ठेवलेला आहे याची नोंद घ्यावी. कोणतीही माहिती, शंका, अडचण विनासंकोच, मोकळेपणाने आणि प्रांजळपणे आधीच विचारून आणि समजून घ्यावी. मनाचे समाधान झाल्यावरच परिक्रमेसाठी नावनोंदणी करावी ही विनंती.

**(६)** सर्व प्रकारच्या तक्रारी दावे यासाठी न्यायालयीन प्रकियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहील.

**व्यवस्था सेवा - सहयोग राशी : रु. ४२,०००/- (+ जीएसटी = रु. २१००/- )**

**तीन व्यक्तिंना : प्रत्येकी रु. ४१,०००/- । पाच व्यक्तिंना : प्रत्येकी रु. ४०,०००/-**

### बँक खात्याची माहिती

**खात्याचे नाव : कर्दळीवन सेवा संघ LLP** **बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र**

**शाखा : डेक्कन जिमखाना पुणे । चालू खाते क्र. : 60351921286 । IFS code : MAHB0000003**

# श्रीदत्त परिक्रमा - माहिती आणि माहात्म्य
















कलियुगामध्ये सर्वात लाभदायक उन्नती करणारी आणि समस्या निराकरण करणारी देवता म्हणजे श्रीगुरू दत्तात्रेय हे आहेत. केवळ स्मरण केल्याने कोणत्याही उपचारांशिवाय फक्त मनःपूर्वक वंदन केल्यावर प्रसन्न होणारी देवता म्हणजे श्रीदत्तात्रेय हे आहेत. श्रीदत्तात्रेयांबरोबरच त्यांचे विविध अवतार, त्यांचे शिष्य, दत्तसांप्रदायिक सत्पुरुष या सर्वांचे वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या भक्तांवर अकारण प्रीती करतात. त्याला बळ देतात. त्याच्या समस्येतून त्याला सोडवतात आणि त्याला भक्तिमार्गावर पुढे घेऊन जातात. जगद्गुरू होण्यासाठी त्यांनी प्रचंड तपश्चर्या, साधना आणि तीर्थाटन केले आहे. श्रीदत्तात्रेय हे एक असे दैवत ज्याचे अस्तित्व चिरंतन आहे. ते सर्वसमावेशक आहे आणि सर्वांना सामावून घेणारे आहे. त्यांचा समन्वयवादी दृष्टिकोन सामाजिक, नैसर्गिक, मानसिक, भावनिक, आध्यात्मिक संतुलन राखण्यासाठी साहाय्यकारी आहे. त्यांचे हे विभूतिमत्त्व अत्यंत प्रत्ययकारी आहे.

आपण काही दत्तक्षेत्री यापूर्वी भेट दिली असेल. मात्र एकाच वेळी २५ दत्तक्षेत्रे आणि ४ शक्तिपीठे यांचे दर्शन ही एक निश्चितच पूर्णपणे वेगळी, रोमांचकारी आणि अलौकिक अनुभूती आहे. विविध प्रकारच्या श्रीदत्त पादुकांचे दर्शन, विविध दत्तावतारांची लीला ठिकाणे आणि दत्तक्षेत्रांच्या विविध परंपरांचे आपल्याला या परिक्रमेदरम्यान मनोज्ञ दर्शन होते.

ज्या ज्या ठिकाणी श्रीदत्त क्षेत्रे आहेत, त्या त्या ठिकाणी विलक्षण चैतन्यशक्ती वास करत असतात असा अनुभव आहे. श्रीदत्त क्षेत्रांठिकाणचे वातावरण, निसर्ग आणि परिसर श्रीदत्त अवतार आणि त्यांच्या शिष्यांच्या तपश्चर्येमुळे, वास्तव्यामुळे आणि लीलांमुळे प्रभावित झालेला आहे. तेथे प्रत्यक्ष गेल्यावर लाखो व्यक्तिंना अशा अनुभूती आलेल्या आहेत.

श्रीदत्त क्षेत्रांच्या ठिकाणी निरंतर कार्यरत असलेली दैवी स्पंदने आणि चैतन्यदायी ऊर्जा यांचा अनुभव प्रत्येक भाविकाला तेथे गेल्यावर येतो. देशातील प्रत्येक श्रीदत्त क्षेत्राला भेट द्यायची भक्तांची इच्छा असते. मात्र तसा योग जमून येणे अवघड असते. संपूर्ण देशात विविध ठिकाणी शेकडो श्रीदत्त क्षेत्रे आहेत आणि गावागावात एखादे दत्तमंदिर असल्याचे आढळते. मात्र तरीही काही प्रमुख श्रीदत्त क्षेत्रं ही प्रसिद्ध आहेत. तेथील अनुभूती आणि रोकडी प्रचिती यामुळे ही दत्तक्षेत्रं नावारूपाला आली आहेत.

## श्रीदत्त परिक्रमा – माहिती

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि गुजरात या ५ राज्यातील अशा २५ दत्तक्षेत्रांना एकत्र गुंफून ही दत्त परिक्रमा केली जाते.

१) **श्रीशंकर महाराज समाधी मंदिर, पुणे** : अक्कलकोट श्रीस्वामी समर्थांचे परमशिष्य महायोगी श्रीशंकर महाराज समाधी
२) **औदुंबर** : नरसिंह सरस्वती स्वामी महाराज यांची साधना स्थळ
३) **अमरापूर** : प्रती काशी, प्राचीन अमरेश्वर मंदिर
४) **नृसिंहवाडी** : श्री दत्तात्रेयांची राजधानी
५) **पैजारवाडी** : श्रीचिले महाराज समाधी मंदिर
६) **कोल्हापूर** : श्री महालक्ष्मी मंदिर
७) **कुडुत्री** : प. पू. गुळवणी महाराज यांचे जन्मस्थान
८) **माणगाव** : प. पू. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांचे जन्मस्थान
९) **बाळेकुंद्री** : प. पू. पंत महाराज बाळेकुंद्रीकर यांचे समाधी मंदिर
१०) **मुरगोड** : प. पू. शिव चिदंबर दीक्षित यांचे मूळपीठ, मूळमहाक्षेत्र संस्थान
११) **कुरवपूर** : श्रीपाद श्रीवल्लभांचे लीलास्थान
१२) **मंथनगुडी** : गुरुचरित्रामध्ये वर्णन केलेले श्रीपाद श्रीवल्लभ आणि वल्लभेश्वर व्यापारी लीलास्थान
१३) **पीठापूर** : श्रीपाद श्रीवल्लभांचे जन्मठिकाण
१४) **लाड चिंचोळी** : प. पू. श्रीधरस्वामी यांचे जन्मस्थान
१५) **कडगंची** : गुरुचरित्र येथे लिहिले गेले...
१६) **माणिकनगर** : प. पू. दत्तावतार माणिकप्रभू यांचे मंदिर
१७) **बसवकल्याण** : दत्तात्रेयांचा कलियुगाच्या प्रारंभीचा प्राचीन अवतार, समाधी भुयार आणि श्रीदत्त पादुका
१८) **गाणगापूर** : नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे लीलास्थान आणि निर्गुण पादुका
१९) **अक्कलकोट** : श्रीस्वामी समर्थ महाराज यांचे समाधी मंदिर
२०) **लातूर** : श्री सदानंद दत्त मठ आणि निर्गुण पादुका
२१) **माहूर** : श्रीदत्तात्रेयांचे जन्मस्थान
२२) **कारंजा** : नरसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचे जन्मस्थान
२३) **शेगाव** : श्री गजानन महाराज मंदिर
२४) **अनसुया** : अनसुया आणि अनसुया श्रीदत्त तीर्थ क्षेत्र
२५) **नारेश्वर** : प. पू. रंगावधूत महाराज समाधी स्थान
२६) **तिलकवाडा** : प. पू. वासुदेवानंद सरस्वती महाराजांचे चातुर्मास ठिकाण
२७) **गरुडेश्वर** : प. पू. वासुदेवानंद सरस्वती महाराजांचे समाधी मंदिर, नर्मदा नदी किनारी

# ✵ श्रीदत्त परिक्रमा – यात्रेकरूंसाठी सूचना व नियमावली ✵

**कर्दळीवन सेवा संघातर्फे श्रीदत्त परिक्रमेसाठीची व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.**

- ही परिक्रमा एसी आरामदायी स्लिपर बसने करण्यात येईल. प्रथम नोंदणी– प्रथम प्रवेश या तत्त्वानुसार परिक्रमेसाठी नोंदणी करताना सीट क्रमांक दिले जातील. परिक्रमेमध्ये राहण्यासाठी हॉटेलमध्ये आणि भक्त निवासामध्ये, खोल्यांमध्ये सोय करण्यात आली आहे. हॉटेलमध्ये २ किंवा ३ व्यक्ती एका खोलीमध्ये आणि भक्त निवासामध्ये ३ किंवा ४ व्यक्ती एका खोलीमध्ये अशी व्यवस्था आहे. कुरवपूर येथे एकत्रित राहण्याची व्यवस्था आहे. बहुतेक सर्व ठिकाणी पलंग, कमोड, बाथरूम, गाद्या, उशी अशी व्यवस्था उपलब्ध आहे. स्वतंत्र खोली हवी असल्यास त्या त्या ठिकाणी अधिक शुल्क द्यावे लागेल. ही व्यवस्था उपलब्धतेनुसार आहे. काही अडचणी आल्यास सहकार्य करावे लागेल. एकूण १२ दिवसांची ही परिक्रमा असेल. परिक्रमेची सुरवात परिक्रमेच्या तारखेच्या पहिल्या दिवशी सकाळी ७ वाजता शंकर महाराज मठ, धनकवडी, पुणे येथून होईल. सर्वांनी ६.३० पर्यंत तेथे येऊन दर्शन घेऊन गाडीमध्ये बसणे अपेक्षित आहे.

- नाश्ता आणि जेवणाची व्यवस्था बहुतेक ठिकाणी स्थानिक हॉटेलमध्ये केलेली आहे. जेवण शुद्ध शाकाहारी आणि थाळी सिस्टीमप्रमाणे असेल. ज्या ठिकाणी भोजन प्रसाद व्यवस्था आहे त्या ठिकाणी उपलब्ध प्रसाद भोजन घेतले जाईल.
- स्वतःचे कपडे, रात्री झोपताना लागणारे कपडे, चादर, स्वेटर आणि पुरेसे पांघरूण, दंतमंजन, पाण्याची बाटली, टॉर्च बरोबर घ्यावेत. नेहमी लागणारी औषधे, इतर वस्तू आपल्या बरोबर घ्याव्यात. प्रवासात कमीत कमी कपडे आणि सामान घ्यावे. हाफपँट किंवा बर्मुडा घेऊ नयेत. श्रीदत्त परिक्रमेचा हा अनुभव आपले अष्टसात्विक भाव जागृत करणारा, दैवी अनुभूती देणारा, आपले मनोबल उंचावणारा आणि कदाचित संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारा असेल असे वाटते. त्यासाठी आपणाला सर्वतोपरी सहाय्य करावे असा आमचा या नियोजनाचा हेतू आहे. ही कोणतीही पिकनिक नाही. स्वत:ला अंतर्बाह्य प्रगल्भ करणारा एक प्रवास म्हणूनच श्रीदत्त परिक्रमेकडे प्रत्येकाने पाहिले पाहिजे. या परिक्रमेने आपली प्रापंचिक, ऐहिक संकटे दूर होण्यास तर मदत होईलच, त्याचबरोबर आपली आध्यात्मिक उन्नती होईल. आपली साधना बळकट होईल, जीवनात एक अपूर्व आनंद निर्माण होईल. श्री दत्तप्रभूंची आणि श्री स्वामी समर्थांची आपल्यावर निश्चितच कृपा होईल, याची अनुभूती या परिक्रमेदरम्यान प्रत्येकाने घ्यावी.

- ज्यांना वेळेवर औषधे घ्यावी लागतात आणि त्याआधी खावे लागते, अशा व्यक्तिंनी त्यासाठी सुके खाद्य पदार्थ स्वत:बरोबर घ्यावेत. कारण काही वेळा नाष्टा किंवा जेवणाची वेळ मागेपुढे होऊ शकते. त्यावेळी ॲडजेस्टमेंट करावी लागेल. स्वतःची प्रकृती उत्तम असेल व यात्रेतील दगदग आपल्याला झेपेल याची खात्री करुन यात्रेत सहभागी व्हावे. यात्रेच्या कालावधीत जीवित व वित्तहानीची जबाबदारी ज्याची त्याचेवर राहील.

- नैसर्गिक आपत्ती किंवा अचानक संप, बंद इ. कोणत्याही अनिवार्य कारणाने यात्रा मध्येच संपवावी लागली अथवा यात्रेचा मार्ग बदलावा लागला तर सदस्याने भरलेल्या रकमेचा कोणताही भाग त्यांना परत केला जाणार नाही. तसेच यात्रेचा राहीलेला भाग पूर्ण करण्याची जबाबदारी आमच्यावर राहणार नाही. त्याचप्रमाणे यात्रेच्या कालावधीत व कार्यक्रमात आवश्यक तो बदल करण्याचा, एखादे स्थळ, गांव रद्द करण्याचा अधिकार आम्हाला राहील. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही.

- बसमध्ये किंवा निवास स्थानावर धुम्रपान अथवा मादक पदार्थ सेवन करता येणार नाही. यात्रेमध्ये असभ्य वर्तन केल्यास, यात्रेच्या शिस्तिचा भंग केल्यास त्या व्यक्तिस कुठलाही रिफंड न देता यात्रेतून निष्कासित करण्याचा अधिकार राहील.
- आपले आधार कार्ड, निवडणूक कार्ड, पॅन कार्ड इ.पैकी कोणतेही ओळखपत्र व त्याची झेरॉक्स प्रत सोबत असावे.

# बस व्यवस्था

## LOWER BIRTH

| DOOR | | DRIVER | |
|---|---|---|---|
| 6 | | 4 | 3 |
| 12 | | 10 | 9 |
| 18 | | 16 | 15 |
| 24 | | 22 | 21 |
| 30 | | 28 | 27 |

## UPPER BIRTHS

| DOOR | | DRIVER | |
|---|---|---|---|
| 5 | | 1 | 2 |
| 11 | | 7 | 8 |
| 17 | | 13 | 14 |
| 23 | | 19 | 20 |
| 29 | | 25 | 26 |

# श्रीदत्त परिक्रमा

## नोंदणी अर्ज

कार्यालयीन उपयोगासाठी

| | |
|---|---|
| परिक्रमा दिनांक : | जमा केलेली रक्कम : |
| नोंदणी दिनांक : | बाकी रक्कम : |

(१) नाव : श्री/सौ/श्रीमती/कु. ____________________

(२) पूर्ण पत्ता : ____________________

____________________

(३) मोबाईल : ____________________ व्हॉटसअप : ____________________

(४) ईमेल : ____________________

(५) जन्मतारीख : ____________________ वय : ____________ लिंग : स्त्री /पुरुष

(६) व्यवसाय : ____________________

(७) यापूर्वी मोठया परिक्रमा / यात्रा केल्या आहेत का ? कोणत्या ?

____________________

(८) श्री दत्त संप्रदाय – श्री स्वामी संप्रदाय याचे भक्त, अनुयायी आहात का ?

____________________

(९) यापूर्वी कोणत्या दत्तस्थानी गेला आहात?

____________________

(१०) आपले कुटुंबीय आणि जवळचे नातेवाईक यांना आपण श्रीदत्त परिक्रमेत सहभागी होणार आहात याची पूर्व कल्पना दिली आहे का ?

____________________

(११) श्रीदत्त परिक्रमेची सर्व माहिती, नियम, अटी आपण समजावून घेतल्या आहेत का ?

____________________

मी श्रीदत्त परिक्रमेमध्ये स्वतःच्या इच्छेने, पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर सहभागी होऊ इच्छितो. मी या परिक्रमेविषयी, त्यातील प्रवास, अडचणी, मार्ग याबाबत सर्व माहिती घेतली आहे. कृपया मला यामध्ये सहभागी करून घ्यावे. ही विनंती.

कळावे,

ठिकाण : सही :

दिनांक : नाव :